PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Gho Mala Asla Hava
Year: 2009

Song: Chand Aala Mathyavar
Lyricist:

हो... रामा रे रामा रं
हो... रामा रे रामा रं
हर हैया हैया हर हैया हो
हर हैया हैया हर हैया हो
चांद आला माथ्यावर
गाव राहिला फाटयावर
चटाचटा पावलं उचल पोरी गो
चटाचटा पावलं उचल पोरी गो
हर हैया हैया हर हैया हो
हर हैया हैया हर हैया हो
चांद आला माथ्यावर
गाव राहिला फाटयावर
चटाचटा पावलं उचल पोरी गो
चटाचटा पावलं उचल पोरी गो

बाबा रं मी तुझी लाडाची पोर
तुझ्या हाती माझ्या दावणीचा दोर
बाबा रं ही तुझी लाडाची पोर
तुझ्या हाती हिच्या दावणीचा दोर
दोराला खुटा आणि बांधायला गोठा
दोराला खुटा आणि बांधायला गोठा
लगीनाच्या हाकाटीला रीतीचा सोटा
लगीनाच्या हाकाटीला रीतीचा सोटा
मी नाय कळपातली शेळी रं
पोर तुझी जगा येगळी रं
ही चंद्राच्या किरणांची जाळी रं
लिहीलं असंल काय रे हिच्या भाळी रं
चांद आला माथ्यावर
गाव राहिला फाटयावर
चटाचटा पावलं उचल पोरी गो

इवल्या इवल्या बाहुलीचे
भोकरा एवढे डोले
बघता बघता सरले किती उन्हं पावसाले
इवल्या इवल्या बाहुलीचे
भोकरा एवढे डोले
बघता बघता सरले किती उन्हं पावसाले
सांभाळली मी परक्याची धनपेटी
वाजत धाडीन तिला मालका भेटी
सांभाळली ही परक्याची धनपेटी
वाजत धाडीन तिला मालका भेटी
हर हैया हैया हर हैया हो
हर हैया हैया हर हैया हो

रीत जनाची मला पाळू दे रं
पाळू दे रं हयाला पाळू दे रं
गोतच्या वाटेनं मला चालू दे रं
चालू दे रं हयाला चालू दे रं
बघता बघता सुखामध्ये न्हाशील गो
आईबापा ईसरून तू जाशील गो
जाशील गो पोरी जाशील गो
चांद आला माथ्यावर
गाव राहिला फाटयावर
जपून तुझं पाऊल घसरंल पोरी गो
चांद आला माथ्यावर
गाव राहिला फाटयावर
काळजात रं माझ्या चलबिचल चलबिचल
सुळसुळती मासोळी जळामध्ये न्हाई

PlanetRead
Literacy for a Billion

जळामध्ये राही गो जळामध्ये न्हाई
हातामधी धरता ती निसटून जाई
निसटून जाई गो निसटून जाई
दडपून टाकता उसळून येई
चमचमत्या चांदण्यात लखलख होई
दडपून टाकता उसळून येई
चमचमत्या चांदण्यात लखलख होई
हो... रामा रे रामा रं
हो... रामा रे रामा रं
हर हैया हैया हर हैया हो
हर हैया हैया हर हैया हो

चांद आला माथ्यावर
गाव राहिला फाटयावर
चटाचटा पावलं उचल पोरी गो
चांद आला माथ्यावर
गाव राहिला फाटयावर
लपकन रस्ता गो दिसल पोरी गो
हर हैया हैया हर हैया हो
हर हैया हैया हर हैया हो
हर हैया हैया हर हैया हो
हर हैया हैया हर हैया हो

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*